# वर्धा नगर परिषद,वर्धा

परवानगी आदेश क्रमांक: ९८९
दिनांक :- 18/2/16

प्रति,

१) मॉ.वैष्णवी बिल्डर्स अँड,डेव्हलपर्स तर्फे
राजकुमार रामरावजी देशमुख व
सौ.संगिता प्रदीपराव रिठे
मानसमंदिर वार्ड क्र.८ वर्धा

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६ चे कलम ४५ आणि**
**महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम,१९६५ चे कलम १८९ (४) अन्वये याव्दारे**

संदर्भ:- इमारत परवान्यास मंजुरी व आरंभ प्रमाणपत्र
प्रकार:- आपला अर्ज क्रमांक १८० दि.११/०१/२०१६

महोदय,

उपरोक्त पत्राप्रमाणे आपला अर्ज. ११/०१/२०१६
भुखंड क्रं.१ सर्वे.क्रं.७/२,८-९/१,१०/१ मौजा पालकवाडी भुखंडाचे क्षेत्र ६१६.२६ चौ.मी. वार्ड क्रं.८
मानसमंदिर वर्धा येथे ७३९.४६४ चौ.मी. रहीवासी व वाणीज्य बांधण्याकरिता मंजुरी मिळण्याचे संदर्भात खालील अटींवर रहीवासी व वाणीज्य बांधकाम मंजुरी करीता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

१)समोरील ,मागील व दोन्ही बाजुनी प्रत्येकी अंमलबजावणी करिता सोडावयास लागणा-या नियमाचे अंमलबजावणीकरिता म्हणून रिकामी झालेली जागा ही सार्वजनिक रस्त्याचा भाग असेल.

२) कोणत्याही इसमास राहण्याचे प्रमाणपत्र प्राप्त होईपर्यंत नविन इमारत अथवा तिचा भाग राहण्याकरिता/उपयोग अथवा राहण्याकरिता परवानगी घेतलेली/उपयोगी होण्याकरिता नसेल.

३) आरंभ प्रमाणपत्र/इमारत परवाना हे परवाना पत्र मिळालेल्या दिनांकापासुन एक वर्षाकरिता देय राहील.

४) जी जमीन अर्जदाराच्या मालकीची नसेल ती विकसीत करण्यासाठी परवानगी अधिकार देणार नाही.

५) नकाशा मंजुर केल्याप्रमाणे/ लाल रंगाने त्यात दुरुस्त्या सुचविल्याप्रमाणे आपल्या घरास/भुखंडास लागुन असणा-या विद्यमान इमारत उपविधी व विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीस अनुसरुन प्रस्तावित घराचे/इमारतीचे बांधकाम असावयास पाहिजे.

६) न्हाणी व संडास,स्वयंपाकगृह इत्यादीचे सांडपाणी,घाणपाणी व कचरा यांची तात्रिकदृष्टया योग्य रितीने विल्हेवाट लावावी.

७) अर्जदारास मंजुर नकाशा व्यतिरिक्त त्यात फेरबदल करावयाचे असल्यास नगरपालिकेची पूर्व मंजुरी घेणेक आवश्यक राहील.

८) बांधकाम परवानगी प्रमाणे प्लीथ लेव्हल पर्यंतची कामे नगरपालिका कडुन तपासणी झाल्याशिवाय पुढील बांधकाम करु नये.

९) बिना परवानगी बांधकाम साहित्य,मलमा सार्वजनिक जागेवर किंवा रस्त्यावर टाकू नये,तसे आढळल्यास आपणावर दंडात्मक जप्तीची कार्यवाही करण्यांत येईल.

१०) लेआऊट टाकल्यानंतर खोदकामापुर्वी नगरपालिकेचे सक्षम अधिका-याकडून तपासणी झाल्याशिवाय व तसे प्रमाणपत्र दिल्याशिवाय खोदकाम सुरु करु नये.वरील पैकी कोणत्याही अटीचे उल्लंघन केल्यास होणा-या परिणामाची सर्वस्वी जबावदारी मिळकत धारकाची राहील.

११) भविष्यात नगर पालिकेला नाली करता जागा लागल्यास ती समास अंतरातून विनामुल्य द्यावी.लागेल.

१२) मंजुर अभिन्यास/रेकार्ड प्रमाणे जागेची आखणी करुन घेण्याची व मालकी हक्काची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची आहे.नगर पालिकेची काही जबाबदार राहणार नाही.

१३) ना अनुज्ञेय बांधकाम अर्जदाराचे स्वत: दोन महिण्याचे आत पाडुन टाकावे अन्यथा नगरपालिका कोणतीही नोटीस न देता पाडून टाकेलच,होणा-या नुकसानीस अर्जदार स्वत: जबाबदार राहील व पाडण्याचा खर्च नगर परिषद वसुल करेल.

१४) पिण्याचे पाण्याची उपलब्धता वाढविणेबाबतचे स्त्रोत बळकटी करण्याकरिता दिलेल्या योजनेप्रमाणे व्यवस्था करावी.अन्यथा आपणास इमारत वापर परवाना मिळणार नाही.

१५) रुफटॉप रेन वॉटर हार्वेस्टींगची व्यवस्था प्रमाणित करावी तसेच सौर अर्जेवर पाणी तापविण्याच्या पध्दतीचा वापर करावा.

१६) भूकंप प्रतिबंधक उपयोजना करुन (नोंदणीकृत स्ट्रक्चरल) इंजिनिअर कडून आर.सी.सी.डिझाईन करुन घेणे व तसे प्रमाणपत्र नगर परिषद कडे सादर करणे बंधनकारक राहील.तसेच सदर इमारतीचा पूर्णत्वाचा दाखला घेण्यापुर्वी Structural Stability Stability बाबत ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१७) महाराष्ट्र अग्निशमन अधिनियम,२००६ व नियम २००९ नुसार प्रत्यक्ष साईटवर अग्निशमन व्यवस्था करुन दयावी. लागेल.तसेच त्याबाबतचे प्रमाणपत्र अग्निशमन विभागाकडुन प्राप्त करुन घेऊन संबंधितास सादर करणे बंधनकारक राहील.

१८) फ़्लॅश ॲश विट चा वापर कंपलसरी करणे

१९) इमारतीवर मोबाईल टॉवरचे बांधकाम परवानगी शिवाय करता येणार नाही.

२०) बांधकाम पुर्ण झाल्यानंतर आवेदकास कम्पलेशन प्रमाणपत्र देवुन न.प.कडुन Occupancy Cerdificate घेणे बंधनकार आहे.

<u>सुचना</u>

१) संदर्भाधिन इमारत परवाना व आरंभ प्रमाणपत्राची मुदत आपणांस प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या दिनांकापासुन एक वर्ष पावेतो वैद्य असतांनाही मुदत दोन महिने अगोदर अर्जदारास पुढील एक वर्षाचे नुतनीकरण करण्याकरिता विहीत नमुन्यात नगरपालिकेत अर्ज करुन आवश्यक आहे.

२) आपण नगरपालिकेत जमा केलेली अमानत रक्कम मंजुर नकाशात प्रारंभ प्रमाणपत्रातील अटीप्रमाणे बांधकाम करणार असल्याची पावती देणे अन्यथा,नगर पालिकेचे पूर्व परवानगीशिवाय आपण बांधकामात केलेले फेरबदत इत्यादी आपली अनामत रक्कम नगरपालिकेचे खाती वळती/जमा होईल.

३) नगरपालिकेने मंजुर केलेल्या बांधकामातील पूर्व परवानगी न घेता केलेले फेरबदल हे अवैध व अनिधकृत राहतील हयामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६ आणि महाराष्ट्र नगर पालीका अधिनियम,१९६५ चे अंतर्गत प्रस्तावित करण्यात येईल.

कायदेशिर कार्यवाही करण्यांत येईल.

कार्यालयाचा शिक्का :

मुख्याधिकारी
नगर परिषद,वर्धा

ओदश क्रमांक:-

दिनांक :-

सहपत्र :१) मंजुर बांधकाम नकाशाच्या प्रती,

२) सूचना फलकावर नमुद करावयाच्या माहितीचे पत्रक.

प्रत माहितीस्तव सादर:

२) मा.जिल्हाधिकारी,वर्धा

३) मा.नगर रचनाकार,नगर रचना,वर्धा

४) कर अधिक्षक,नगर परिषद,वर्धा यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव


PLAN SHOWING PROPOSED RESIDENTIAL BUILDING UNIT ON PLOT NO.-01, MOUZA - AKWADI, TALUKA, DIST-WARDHA.
FRONT ELEVATION
SECTIONAL ELEVATION AT 'SS'
SITE PLAN
GROUND FLOOR PLAN
FIRST & THIRD FLOOR PLAN
SECOND & FOURTH FLOOR PLAN
AREA KEY PLANS
STAMP OF APPROVAL
PROPOSED RESIDENTIAL COMPLEX ON, PLOT NO.-01, MOUZA- PALAKWADI, SURVEY NO.- TAH. & DIST - WARDHA.
DP EXTRACT (NOT TO SCALE)
SCHEDULE OF OPENINGS
T.W. DOOR
REFERENCE :
SUBMISSION DWG.
AREA STATEMENT
GROUND FLOOR PLAN
FIRST FLOOR PLAN
SECOND & FOURTH FLOOR PLAN
THIRD FLOOR PLAN
COMPOUND WALL SECTION
DETAIL OF SEPTIC TANK
SECTION OF RAIN HARVESTING SYSTEM
Note - ALL DIMENSIONS ARE IN MM.